# ५ जून - जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने !



**काय गं, आज पर्यावरण दिन आहे ना ? मग कसा काय साजरा करणार आहात हा दिवस तुम्ही पर्यावरण तज्ञ ?** माझ्या मैत्रिणीने प्रीतीने घरात येत विचारले.

अग, हा दिवस काही फक्त आमच्यासाठीच नाहीए ! तर सामान्य माणसांना पर्यावरणाचे, आपल्या पृथ्वीचे, निसर्गाचे महत्व कळावे आणि सर्वांनी मिळून त्यासाठी एकजुटीने प्रयत्न करावे म्हणून युनायटेड नेशन्स ऑफ एनवायरोनमेंट प्रोग्राम ह्या संस्थेने १९७३ पासून सुरु केलाय. तुला माहितीये का या वर्षाचे घोष वाक्य काय आहे ते ??

**नाही गं !! काय आहे ही थीम ???**

"One billion dreams, one planet, consume with care ".

ह्याचा अर्थ पृथ्वीवरच्या नैसर्गिक साधन संपत्तीचा अमर्याद वापर जर अश्याच रितीने सुरु राहिला तर २०५० साला पर्यंत आपल्याला अश्या ३ पृथ्वींची गरज लागेल असे संशोधन सांगते, त्यासाठीच गरज आहे ती sustainable lifestyle ची.

**यासाठी आपण सामान्य माणूस म्हणून, कसे काय प्रयत्न करणार गं ???**

प्रीती, आपण आपल्या रोजच्या आयुष्यात जरासे तरी सकारात्मक बदल केले ना, तरी एकत्रितपणे त्याचा खूप चांगला परिणाम दिसून येऊ शकतो. आपल्याला फक्त आपले कार्बन निर्मितीचे प्रमाण कमी करायचे आहे.

**आपण आणि कार्बन निर्माण करतो तो कसा काय ?**

रोजच्या आपल्या वैयक्तिक तसेच व्यावसायिक आयुष्यातील जाण्यायेण्याचा प्रवास/वाहतूक, आपल्या खाण्याच्या सवयी, ह्या सर्वात होणारा नैसर्गिक इंधनाचा वापर उदा. विजेचा वापर, या सर्वातून प्रचंड कार्बन निर्माण होत असतो.

**ह्यावर उपाय काय ?**

आता हेच बघ ना, ऑफिसला जाताना, रोज प्रवास करताना प्रत्येकाने स्वतःच्या गाडी ऐवजी जास्तीतजास्त सार्वजनिक वाहतूकीचा बस, ट्रेन, मेट्रो इत्यादींचा वापर केला पाहिजे. Car pooling म्हणजेच एकाच गाडीत एकाच दिशेने जाणारी तीन-चार माणसे अशी पध्दत अवलंबली पाहिजे तसेच सीएनजी च्या गाड्या, ज्या कमी प्रदूषण करतात त्यांचा वापर केला पाहिजे आणि चक्क सायकलींकडे मोर्चा वळवला पाहिजे !

आंघोळीसाठी शॉवरचा वापर कटाक्षाने टाळून आपली नेहमीची तांब्या बादलीची पध्दत केव्हाही चांगलीच. कारण त्यातून पाण्याचा अपव्यय टळतोच आणि हे पाणी जेव्हा घरोघरी आपल्यापर्यंत पोहोचते तेव्हा त्यावर भरपूर प्रकिं या होत असतात. पम्पिंगमध्ये खूप वीज खर्च होते आणि त्यातून कार्बन निर्माण होत असतो.

त्यासाठीच आपण eco smart झालं पाहिजे. साध्या साध्या गोष्टी आहेत.

कॉम्प्युटर – लॅपटॉप स्लीप मोड वर न ठेवता बंद केले पाहिजेत, पेपर प्रिंट करताना पाठपोट वापरला पाहिजे.

तुला इको शॉपी व्हायला नक्कीच आवडेल ना ! आपण मॉलमध्ये / बाजारात खरेदी करायला जातो आणि असं'य गरज नसलेल्या वस्तूंची खरेदी करतो. ते टाळले पाहिजे आणि महत्वाचे म्हणजे प्लास्टिकच्या पिशव्यांना ठामपणे नाही म्हटले पाहिजे. आपण बाहेर पडताना जसा रुमाल आठवणीने जवळ ठेवतो ना तश्याच एक दोन कापडी पिशव्या आवर्जून जवळ ठेवल्या पाहिजेत. बाहेरुन आयात केलेल्या वस्तू, फळे भाज्या खरेदी न करता, स्थानिक उगवलेल्या फळभाज्या, फळे ह्यांना प्राधान्य दिले पाहिजे. कारण ह्या भाज्या – फळे स्थानिक हवामानात वाढलेल्या असल्यामुळे आरोग्यदायी तर असतातच पण जर त्या परदेशातून आयात केल्या असतील, तर आपल्यापर्यंत पोहोचेपर्यंत त्यांना खूप इंधनाची गरज लागते आणि त्यातून पुन्हा कार्बनची निर्मिती होते.

म्हणूनच आपलं रोजचं जेवणसुध्दा आपण वाया घालवता कामा नये, कारण ते तयार करताना इंधन तर लागतेच, पण जेव्हा ते आपण फेकून देतो तेव्हा ते डम्पिंग ग्राऊंडवर इतर जैविक कचऱ्याबरोबर मिसळल्यामुळे त्यातून मिथेन वायू ($CO_2$ पेक्षा २५ पटींनी जास्त धोकादायक ) तयार होतो आणि आपल्या देशातील गरिबी व भूकबळी ची संख्या लक्षात घेता आपल्याला हे नक्कीच परवडण्यासारखे नाही.

आजकाल आपण ग्लोबल वॉर्मिंग झालाय हे सतत ऐकत असतो ना, ते ह्याच वाढत चाललेल्या धोकादायक कार्बन डाय ऑक्साइड च्या पातळीमुळे !

ह्या ग्लोबल वॉर्मिंगमुळे हिमनग वितळून सागरी पातळी वाढत आहे आणि त्यामुळे मुंबई –न्यूयॉर्क सारख्या समुद्र किनाऱ्याजवळच्या शहरांना धोका निर्माण झाला आहे त्यासाठी कडक उपाय योजना सुचवल्या जात आहेत. जास्तीत जास्त झाडे लावा नि जगवा ही मोहीम सुरु झाली आहे. संशोधन सांगते की एक पूर्ण वाढलेले झाड एका वर्षात वीस किलो कार्बन डाय ऑक्साईड ची भरपाई करते. मुंबईत जागेची टंचाई आहेच तरी देखील शक्य तेथे अगदी छोट्याश्या खिडकीतून बाल्कनीत झाडे लावलीच पाहिजेत. किचन गार्डन तर उत्तमच !

अग, सध्या मी Grow-Trees.com या सामाजिक संस्थेशी निगडित आहे. ती आपल्या देशात अनेक ठिकाणी लाखोंनी वृक्ष लागवड करते, आणि त्यांची देखभालसुध्दा करते. ह्या देखभालीसाठी स्थानिक लोकांना रोजगारही उपलब्ध करुन देते. गंमत म्हणजे आपण आपल्या मित्र मैत्रिणीना, नातेवाईकांना विविध प्रसंगी ही झाडे e-certificate द्वारा भेट देऊ शकतो, जसं ग्रिटिंग कार्ड देतो ना अगदी तसं !

छानच आहे ही कल्पना! या पेक्षा ग्रीन गिफ्ट असूच शकत नाही. मी आजच Grow-Trees.com ही वेबसाईट पाहाते. सर्वांना पर्यावरण दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

**सुप्रिया पाटील** – ९८७०७९०००७
Masters in Environmental Science
Email- sspatil1011@gmail.com